**न्यायालयीन प्रकरण/तातडीचे**

क्र. पोमसं/१४/६६/अँन्टी. बेल अॅप्लि. क्र. ३३५-२०१८/२८८/२०१८ मुंबई, दिनांक ३१.०८.२०१८

संदर्भ:-

१. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/१४-अ / ६७ / संकीर्ण / ०३ / २०१७, दिनांक ३१.०७.२०१७.

२. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं / १४ / ६६ / न्यायालयीन प्रकरणे हाताळणे / ५०४ / २०१७, दिनांक ०७.१०.२०१७.

विषय:- **न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याबाबत मार्गदर्शक सूचना.** शासनाच्या वतीने प्राधिकृत करण्यात आलेल्या प्राधिकाऱ्यांनी अवलंबण्याबाबतची कार्यपध्दती...

*****

**परिपत्रक:-**

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याबाबत मार्गदर्शक सूचना यापूर्वीच निर्गमित करण्यात आल्या असून त्यामध्ये न्यायालयीन कामकाजात दाखल करण्यात येणारी शपथपत्रे किमान पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (गट-अ) (राजपत्रित) व त्यावरील अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने न्यायालयात दाखल करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, काही प्रकरणांमध्ये घटकांडून सदर परिपत्रकांस अनुसरुन कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाने ही बाब वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये अधोरेखित केली आहे.

न्यायालयीन प्रकरणामध्ये दाखल करण्यात येणारी शपथपत्रे ही पोलीस अधीक्षक / पोलीस उप आयुक्त यांच्या देखरेखीखाली सादर करण्यात यावीत. तसेच घटक प्रमुखांनी सादर करण्यात येणाऱ्या शपथपत्रातील मजकूर व्यक्तीश: तपासून तो योग्य असल्याची खात्री करावी जेणेकरुन मा. न्यायालयाची नाराजी ओढवणार नाही व पोलीस दलाची प्रतिमा मलिन होणार नाही.

तरी घटक प्रमुखांना पुन्हा याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याबाबत महाराष्ट्र शासन, गृह विभागाचे परिपत्रक क्र. न्यायप्र-१०१६/प्र.क्र.४६४/पोल-५अ, दिनांक १९.०७.२०१७ व क्र. न्यायप्र-१५/१०/२०१७/विधी कक्ष, दिनांक ११.०९.२०१७ मध्ये विहित केलेल्या पद्धतीचे काटेकोरपणे पालन करावे. **शासन परिपत्रकात नमूद बाबींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीतांस तसेच घटक प्रमुखास व्यक्तिश: जबाबदार धरण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.**

( अनुप कुमार सिंह )
विशेष पोलीस महानिरीक्षक (का. व सु.),
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त,
सर्व अपर पोलीस महासंचालक,

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक,

विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण व महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

पोलीस उपमहानिरीक्षक, नक्षलवादी परिक्षेत्र, कॅम्प नागपूर,

सर्व पोलीस अधीक्षक,

सर्व समादेशक, रा.रा.पो.बल,

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र.

प्रत,

पोलीस महानिरीक्षक यांचे उपसहायक (गुन्हे), म. रा., मुंबई

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १४-अ, २१, २२, २३, २४, ३६ व ए.पी.ए. शाखा.

प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीकरिता

पोलीस उपअधीक्षक, संगणक विभाग, म. रा., मुंबई

२.- यांनी सदरचे परिपत्रक महाराष्ट्र पोलीस दलाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावे.

Regarding guidelines for Handling Court Matters.